पुणे पोलीस

वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

पुणे शहर वाहतुक पोलीस
PUNE CITY TRAFFIC POLICE

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ 8130/२०२३ दिनांक :-09 /११/२०२३

## प्रेसनोट

पुणे विद्यापीठ चौक परिसरामध्ये मेट्रो सह एकात्मिक दुमजली उड्डाणपुलाचे काम सुरु असुन सदर कामाकरीता पिलर्सचे काम मेट्रो व उड्डाणपुलाच्या पिलरचे काम करणेकरीता रस्ता खोदाई व बॅरिकेडींग करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यापीठ चौक व परिसरातील वाहतूकीत बदल करणे गरजेचे आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, त्या अनुषंगाने चतु:श्रृंगी वाहतुक विभागा अंतर्गत विद्यापीठ चौक परिसरातील वाहतूकीत **दि. १०/११/२०२३** रोजीपासून खालीलप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात बदल करीत आहे.

### चतु:श्रृंगी वाहतूक विभागा अंतर्गत

- **औंध रोडवरुन शिवाजीनगरकडे जाणाऱ्या वाहनांसाठी खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.**

**१) औंध रोडवरुन शिवाजीनगरकडे जाणाऱ्या दुचाकी वाहनचालकांनी मिलेनियम गेट (चतु:श्रृंगी पोस्टे) मधुन विद्यापीठामध्ये प्रवेश करावा व मुख्य गेटमधुन बाहरे पडावे (वेळ दररोज सकाळी ०८.०० ते २०.०० वा.)**

**२) सर्व प्रकारच्या मिनी बस, बस (पी.एम.पी.एम.एल., लक्झरी ) यांनी डाव्या बाजुचे लेनचा वापर करावा.**

**३) तीन चाकी व चारचाकी वाहनचालकांनी उजव्या बाजुचे लेनचा वापर करावा.**

**वर नमुद वाहतूकीमधील बदल हे पुणे विद्यापीठ चौकातील पुलाचे व मेट्रोलाईनचे बांधकाम संपेपर्यत अंमलात राहतील.**

**करण्यात येत आहेत.**

9-11-2023

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**